# प्रकरण दुसरे

## शिक्षणाचे व्यावसायीकरण : अर्थ, महत्त्व, वास्तविक भूमिका व गरज

## प्रकरण दुसरे

## शिक्षणाचे व्यावसायीकरण : अर्थ, महत्त्व, तात्विक भूमिका व गरज


२.१ प्रास्ताविक

२.२ शिक्षणाचे व्यावसायीकरण याचा अर्थ

२.३ शिक्षणाचे व्यावसायीकरण - तात्विक भूमिका

२.४ शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची उद्दिष्टे

२.५ शिक्षणाच्या व्यावसायीकरणाचे महत्त्व व गरज

२.६ शिक्षणाचे व्यावसायीकरण - काही समस्या

२.७ समारोप

## २.१ प्रास्ताविक :

मागील प्रकरणात (प्रकरण पहिले - प्रास्ताविक) प्रस्तुत संशोधन समस्या कशी निर्माण झाली ? समस्येचे शब्दांकन, समस्याविधानातील विविध संज्ञांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, मर्यादा, संशोधनाचे महत्व, व्याप्ती या मुद्यांचा ऊहापोह करून संशोधनविषयाचा परिचय करून दिलेला आहे. तथापि संशोधनासाठी आवश्यक असलेली सैध्दांतिक पार्श्वभूमी विशद केलेली नाही. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणामध्ये शिक्षणाच्या व्यावसायीकरणाचा नेमका अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर शिक्षणाच्या व्यावसायीकरणाबाबतची तात्विक भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची उद्दिष्टे, महत्व व गरज स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी व्यवसाय शिक्षणाचे योगदान आवश्यक आहे. अर्थात व्यवसाय शिक्षण हे राष्ट्र विकासाचे प्रमुख साधन आहे. समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचे व्यावसायीकरण मूलभूत स्वरूपाची भूमिका पार पाडीत असते. शिक्षणाचे व्यावसायीकरण हा मानवाच्या सृजनशीलता व प्रगतीदर्शक विकासाचा एक अविभाज्य भाग आहे. सर्वसाधारण-पणे शिक्षणाचे व्यावसायीकरणाचा संबंध हा ' नोकरीसाठी उपयुक्त ' असा अर्थ जोडला जाई. परंतु ही संकल्पना शिक्षणाच्या विकासाबरोबर मागे पडलेली आहे.

विज्ञानयुगामध्ये तंत्रज्ञानात प्रगती झालेली दिसून येते. विज्ञानाभिमुख शिक्षण हे शालेय शिक्षणाचा एकात्मक स्वरूपाचा घटक ठरलेला आहे. विज्ञानामुळे औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरण झपाट्याने होत आहे. त्यामुळे परिस्थितीप्रमाणे शैक्षणिक बदलाची आवश्यकता भासू लागली आहे. शिक्षणाच्या ध्येयाचा विचार करता आर्थिक स्थैर्य व मनुष्यबळाचा योग्य वापर होणे आवश्यक ठरते.

भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शैक्षणिक पध्दतीमध्ये बराच बदल झालेला आहे. शिक्षणाचे ध्येय राष्ट्रीय ध्येयाप्रमाणे व विकासाच्या दृष्टीने ठरत असते. शालेय शिक्षणामध्ये व्यवसाय शिक्षणाचे महत्व वाढविण्याचे प्रयत्न अनेकदा केले गेले परंतु त्यात म्हणावे तसे यश आले नाही. व्यवसाय शिक्षणाचे शालेय स्तरावर महत्व वाढविण्याच्या हेतूने प्रेरित होऊन १९६४ साली नियुक्त केलेल्या राष्ट्रीय शिक्षण आयोगाने शालेय शिक्षणामध्ये व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव केलेला आहे.

१०+२+३ या स्तरावरील शैक्षणिक आकृतीबंधामुळे विद्यार्थ्यांची बौध्दिक क्षमता, कौशाल्य व आवडनिवड यासारख्या बाबींचा विचार केला आहे. व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमामधून जास्तीतजास्त रोजगार उपलब्ध होईल या दृष्टीने प्रयत्न केला जातो. व्यावसायिक अभ्यासक्रमात तांत्रिक शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तांत्रिक शाळा, कृषी-औद्योगिक संस्था इ. चा समावेश होतो. अधिक दोन स्तरावरील व्यावसायिक शिक्षणामधून धंदेवाईक शिक्षण देऊन वैयक्तिक कौशाल्ये विकसित करता येतात. वैयक्तिक कौशाल्याबाबत व्यक्ती पारंगत बनत जाते.

## २.२ ` शिक्षणाचे व्यावसायीकरण ` याचा अर्थ :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अधिक दोन स्तरावरील शिक्षणाचे व्यावसायीकरण हे महत्वाचा टप्पा मानला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणाचे व्यावसायीकरण हे केवळ आर्थिक बाबीपुरतेच मर्यादित नसून त्यामधून नैतिक आणि सामाजिक मूल्यांच्या दृष्टिकोनातूनदेखील विचार केलेला आहे. भारतीय शिक्षण आयोग (१९६४-६६) यानी निरीक्षण करून पुढील विचार मांडले.

" आम्ही भविष्यकाळातील शालेय शिक्षण डोळ्यापुढे आणले तर सर्वसाधारण शिक्षण व व्यावसायिक शिक्षण स्कमेकांमध्ये मिसळलेले दिसून येते. सर्वसाधारण शिक्षणामध्ये पूर्व व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाच्या काही घटकांचा अंतर्भाव झालेला दिसून येतो, तर व्यावसायिक शिक्षणात सर्वसाधारण शिक्षणाच्या काही घटकांचा अंतर्भाव झालेला असेल." [१]

व्यवसाय शिक्षण या संज्ञेची पुढील प्रमाणे व्याख्या केलेली आहे.

> "All activities in or out of school designed to contribute to occupational proficiency.includes apprenticeships, guidance in schools, training programmes, on the job training, retraining personnel."[2]

व्यावसायिक शिक्षणामध्ये ब-याच कृतींचा समावेश होतो. शालेय आराखडा तयार करताना व्यावसायिक दृष्टिकोनातून प्रयत्न केला जातो. शिकाऊपणा, शाळांमधून दिले जाणारे मार्गदर्शन, प्रशिक्षण कार्यक्रम, व्यवसाय-प्रशिक्षण, पुनर्शिक्षण यांचा समावेश होतो.

शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रमाणित संदर्भ म्हणून कार्टर गुडच्या शब्दकोशाचा समावेश आहे. त्यांच्यामध्ये व्यावसायिक शिक्षणाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे :

> "A programme of education below college grade organised to prepare the learner for entrance into a particular chosen vocation or to upgrade employed workers; includes such divisions as trade and industrial education, technical education, agricultural education and home economics education."[3]

महाविद्यालयीन स्तराखालील शिक्षणाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विशिष्ट व्यवसायामध्ये प्रवेश करण्यासाठी व्यवसाय शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शेतीशास्त्र वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण आणि अर्थ-गृह शिक्षण यांचा समावेश केलेला आहे.

चेस्टर डब्ल्यू हॅरीस यांच्या "Encyclopedia of Educational Research" मध्ये व्यावसायिक शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

> "Vocational education is education for work, any kind of work, which the individual finds congenial and for which society has a need. Vocational education is specialised education as distinguished from general education."[4]

" समाजाला ज्या कामाची गरज आहे आणि जे काम व्यक्तीला हितकारक ठरते अशाप्रकारच्या कोणत्याही कामाचे शिक्षण म्हणजे व्यवसाय शिक्षण होय. व्यवसाय शिक्षण हे सर्वसाधारण शिक्षणापेक्षा वेगळे असून विशेष प्रकारचे शिक्षण आहे. "

दि अमेरिकन व्होकेशनल एज्युकेशन असोसिएशनने व्यवसाय शिक्षणाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे :

> "Vocational education is education designed to develop skills, abilities, understandings, attitudes, work habits and appreciations needed by workers to enter and make progress in employment on a useful and productive basis."[5]

कामगाराला रोजगारामध्ये प्रवेश व प्रगती करण्यासाठी उपयोगी व उत्पादकतेवर भर देऊन कौशल्ये विकसित करणे, आकलनक्षमता, दृष्टिकोन, कामाची सवय, रसग्रहण व इत्यादीमध्ये वाढ करणे. त्या शिक्षणाला व्यावसायिक शिक्षण म्हणतात.

जॉन एफ. थॉमसन यांनी ` फाउंडेशन ऑफ व्होकेशनल एज्युकेशन ` या ग्रंथात व्यावसायिक शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

> "Vocational education is any education that provides experiences visual stimuli, affective awareness, cognitive information or psychomotor skills, and that enhances the vocational development processes of exploring, establishing and maintaining oneself in the world of work."[6]

जे शिक्षण एखाद्या व्यवसायाविषयी क्रियात्मक कौशल्ये, ज्ञानात्मक माहिती, भावात्मक जागृती, दृक प्रेरणा आणि अनुभव पुरविते अशाप्रकारचे कोणतेही शिक्षण म्हणजे व्यवसाय शिक्षण होय. तसेच ते शिक्षण व्यवसायाशी निगडित असलेल्या घटकांचे स्पष्टीकरण करून व्यवसाय-क्षेत्रात स्वत:ला प्रस्थापित करून स्थिर राहण्याच्या व्यावसायिक विकासाच्या प्रक्रियेला वृध्दिंगत करते.

वरील सर्व व्याख्यांवरून व्यवसाय शिक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) व्यवसायिक शिक्षणामध्ये ब-याच कृतींचा समावेश असतो.

२) व्यवसायिक शिक्षणामधून व्यावसायिक दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवला जातो.

३) महाविद्यालयीन स्तराखालील जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची आखणी असते.

४) व्यावसायिक शिक्षण कामगाराला रोजगारात प्रवेश व प्रगती करण्यासाठी मदत करते.

५) व्यावसायिक शिक्षण व्यवसायाशी निगडित असलेल्या घटकांचे स्पष्टीकरण करून व्यवसाय क्षेत्रात स्वत:ला प्रस्थापित करून स्थिर राहण्याच्या व्यावसायिक विकासाच्या प्रक्रियेला वृध्दिंगत करते.

## २.३ शिक्षणाच्या व्यावसायीकरणाबाबतची तात्त्विक भूमिका :

व्यावसायिक शिक्षण लोकशाही तत्वावर आधारित आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्ती ही महत्वाची आहे. तसेच तिला शिक्षण घेण्याचा हक्क आहे. समाजाने प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेप्रमाणे शिक्षणाची संधी दिली पाहिजे. सबब शिक्षण केवळ बौध्दिक क्षमतेशीच निगडित न मानता मनुष्याच्या शारीरिक, मानसिक, कार्यात्मक क्षमतांशीसुध्दा निगडित असून या क्षमतांचा विकास करणे शिक्षणाकडून अपेक्षित आहे. म्हणून लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार केलेल्या राष्ट्रांना केवळ बौध्दिक (अकॅडमिक) शिक्षणाची सोय करून चालणार नाही तर त्याचबरोबर नागरिकांच्या वरील क्षमतांचा विकास करणे, शिक्षण देणेही आवश्यक आहे. सबब व्यवसाय शिक्षणाची सोय करणेदेखील अनिवार्य आहे.

सर्व माणसे जन्मत:च समान असतात. हे विधान परमेश्वर आणि न्यायदेवते समोर सर्व सारखे आहेत स्वढयाच मर्यादित अर्थाने घेतले पाहिजे. परंतु वास्तविक पाहता मानसशास्त्र असे सांगते की कोणत्याही दोन व्यक्ती सारख्या नसतात अगदी दोन जुळ्या भावंडामध्येदेखील भिन्नता आढळून येते. व्यक्तीमध्ये ही भिन्नता जैविक, शारीरिक, घरगुती आणि सामाजिक वातावरण, मानसिक क्षमता, आवड दृष्टिकोन, व्यक्तिमत्व, संपादित गुण इ. बाबत दिसून येते. प्रत्येक व्यक्तीला लोकशाहीमध्ये अभिप्रेत असलेली शिक्षणाची समान संधी साकार करावयाची असल्यास प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेनुसार शिक्षण घावयास हवे. सबब शिक्षण व्यवस्थेत व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव करणे अपरिहार्य आहे.

शैक्षणिक कार्यक्रमातून व्यक्तीचा मोठेपणा, प्रामाणिकपणा, सचोटी इत्यादीसाठी प्रयत्न केले जातात. समानतेची संधी आचरणात आणण्या-साठी लोकशाही राज्यामध्ये वेगवेगळ्या अभ्यासक्रमातून त्याला जबाबदारपूर्वक वळण दिले पाहिजे. व्यक्तींनी क्षमता, आवड, दृष्टिकोन, कला इ. चा विचार करून शक्य असल्यास प्राविण्य मिळविले पाहिजे. विद्यार्थ्यांना त्याच्या आवडी प्रमाणे व गरजेप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रम निवडता येतो. त्याला संधी प्राप्त होते.

शिक्षण म्हणजे केवळ मनाचा किंवा बुध्दीचा भाग नव्हे. शिक्षण व्यक्तीला हात, डोळा, स्नायु व मेंदू यांसह संपूर्णपणे गुंतवून ठेवते. विद्यार्थी शाळेत शिकत असतो त्यावेळी तो इतर ठिकाणी कार्य करीत असतो. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक आणि सांस्कृतिक विकासावर चांगल्या माध्यमाचा परिणाम होत असतो. माध्यमाचा वापर केल्यामुळे क्षमता व दृष्टिकोन याबाबत स्पष्टीकरण करता येते. माध्यमाची गरज ही अशैक्षणिक ( Non-academic ) क्षेत्रामध्ये सुध्दा जाणवते.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. त्याचा प्रभाव हा त्याच्या विकासावर व प्रगतीवर पडत असतो. समाजावर पडतो. म्हणून व्यक्तीला दोन तऱ्हेची भूमिका पार पाडावी लागते. समाजाचा व्यक्तिवर अधिकार आहे. व्यक्ती समाज उपयोगी घटक आहे. व्यक्तीच्या जीवनामध्ये व्यवसायामुळे स्थैर्य प्राप्त होते. याचाच अर्थ असा नव्हे की, शिक्षणाचे ध्येय हे विद्यार्थ्यांना भाजी भाकर मिळवून देणे. शिक्षणाचा निश्चित असा हेतू आहे की, मूळ आदर्श, कला आणि रसग्रहण यामुळे लोकशाही मानणारा नागरिक तयार होण्यास मदत करणे. यासाठी विद्यार्थ्यांनी निश्चित स्वरूपाचे महत्वाचे विषय शिकले पाहिजेत. महत्वाचे विषय शिकत असताना प्रात्यक्षिक विषयाकडे दुर्लक्ष होता कामा नये. उत्पादक, सहकारी, समतुल्य आणि समाजउपयोगी व्यक्ती निर्माण होण्यासाठी व्यवसाय शिक्षण आवश्यक आहे.

कार्ल मार्क्सच्या मते मनुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी व्यावसायिक कार्यक्षमता ही अत्यंत आवश्यक आहे. त्याने सामाजिक प्रगती होण्यासाठी उत्पादक कार्य हा पाया मानला आहे. म्हणूनच सर्वसाधारण शिक्षणाला व्यावसायिक शिक्षण पूरक मानले आहे.

व्यावसायिक शिक्षणाचा पाया शैक्षणिक तत्वज्ञानाच्या वास्तववादी पंथाच्या सिध्दान्तावर आधारित आहे. जेम्स एस्. रॉस यांच्या मते,

> "The cry for realism often takes the specific form of a demand that education should be directed towards a particular calling in life, that is to say, that it should be vocational in character."[7]

शिक्षणातील वास्तववाद पुष्कळ वेळेला शिक्षण हे आयुष्यातील एखाद्या विशिष्ट व्यवसायाला वाहून घेतले असावे असा आग्रह धरते. याचाच अर्थ शिक्षण व्यावसायिक असावे.

## २.४ शिक्षणाच्या व्यावसायिकरणाची उद्दिष्टे :

माध्यमिक स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थी साधारणत: उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळतो. परंतु उच्च स्तरावरील सर्वसाधारण शिक्षण घेतल्यामुळे रोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची निराशा होते. लोकशाही तत्व आणि श्रमप्रतिष्ठा आणि श्रममूल्य यांचे सखोल आकलन यामधून शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची उद्दिष्टे मिळतात. शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

१) व्यावसायिक जगतामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे काम पुरविणे. व्यावसायिक शिक्षणातून रोजगारासाठी योग्य व्यक्ती बनविण्यासाठी कौशल्ये आत्मसात करून घेतली जातात. व्यावसायिक शिक्षण व्यक्तीमधील कौशल्ये विकसित करण्यासाठी मदत करते. उदा. वेगवेगळी कौशल्ये ही रोजगारासाठी उपयुक्त ठरतात. आकडेवारी, प्रसरण सेवा, माहिती संस्करण, निर्णय क्षमता इत्यादी कौशल्ये संपादन करण्यासाठी व्यावसायिक शिक्षण मदत करीत असते.

२) वैयक्तिक सृजनशीलतेचा विकास साधणे - व्यावसायिक शिक्षण व्यक्तीमध्ये असणाऱ्या कौशल्यांचा विकास करते. त्यातून सृजनशीलता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केला जातो.

व्यक्तीची कारकीर्द आणि व्यवसायाभिमुख क्षमतांमध्ये व्यावसायिक शिक्षण सुधारणा करते.

३) स्थानिक, राज्य व देशस्तरावर आर्थिक विकासामध्ये स्थैर्य व वाढ होण्यामध्ये व्यावसायिक शिक्षण मोठया प्रमाणावर प्रयत्न करीत असते.

## २.५ शिक्षणाच्या व्यावसायीकरणाचे महत्व व गरज :

मनुष्य हा बुध्दिवान प्राणी आहे. त्याला त्याच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी पैशाची गरज लागते. व्यक्ती आपल्या क्षमता, कुवती प्रमाणे रोजगार मिळवू शकतात. व्यक्तीच्या कौशल्यावर रोजगार मिळू शकतो. व्यावसायिक शिक्षण व्यक्तीला ज्ञान, कौशल्य व दृष्टिकोन गरजे-प्रमाणे विकसित करण्यासाठी मदत करीत असतो.

भारताची वाटचाल औद्योगिकीकरणाकडे होत आहे. शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे कार्यक्षम कर्मचारी वर्ग निर्माण होऊन देशाच्या विकासासाठी हातभार लावतात. विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण देऊन जीवनांत त्यांना स्वयंरोजगारास प्रवृत्त केले जाते. स्थानिक रोजगाराची उपलब्धता विचारात घेऊन व्यावसायिक शिक्षणाची व्याप्ती वाढविली जाते. तांत्रिक, वाणिज्य, शेतीशास्त्र, गृहशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादींचा समावेश केला जातो.[८]

शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे विद्यार्थी त्याच्या आवडीप्रमाणे रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे वळतो. व्यक्तीला निश्चित स्वरुपाचे ध्येय गाठण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची मदत होते.

मानवाच्या व्यवसायामुळे राहणीमान ठरत असते. शिक्षणामध्ये व्यक्ती आणि कौशल्ये महत्वाची आहेत. कौशल्य आत्मसात केल्यामुळे व्यक्तीला जास्तीतजास्त समाधान मिळते. व्यवसाय समाधानातून व्यावसायिक शिक्षणाचा विकास व परिपक्वता साधता येते. कार्ल मार्क्स यांच्या शब्दात,

> "The education of the future will in the case of every child over a certain age, combine productive labour with education and athletics not merely as one of the methods of raising social production but as the only method of producing fully developed human beings."[9]

शिक्षण हे भविष्यकाळाचा विचार करते. प्रत्येक बालकाचा निश्चित वयाचा विचार करून सामूहिक कार्य शिक्षणामुळे होते. मानवाचा सामाजिक विकास साधला जातो.

आर. डब्ल्यू. रॉबर्टस् यांच्या मते,

> "Vocational education programmes increase the efficiency of modern industry by making available to workers opportunities to acquire additional skills and information."[10]

व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमातून आधुनिक व्यवसायाची कार्यक्षमता वाढत जाते. उपलब्ध कामगारांना नवीन कौशल्ये व माहिती मिळविता येते.

व्यावसायिक शिक्षणामुळे कुशल कामगारांचा पुरवठा करता येतो. व्यावसायिक शिक्षण हे अर्थशास्त्रीय शिक्षण आहे. त्यामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासास हातभार लावता येतो. स्थानिक, राज्य व देशपातळीवर आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यास मदत होते.

सध्या औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रामध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रशिक्षित व कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासते. यासाठी शाळा व महाविद्यालयांतून शिक्षणाच्या व्यवसायीकरणाबाबतचा विचार होणे गरजेचे ठरते.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यावसायिक शिक्षण अप्रत्यक्षरित्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी, आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्न करते. निव्वळ सैध्दांतिक शिक्षण देऊन चालणार नाही त्याचबरोबर व्यावसायिक शिक्षण देण्याची गरज आहे.

व्यक्ती आणि समाज यांना त्यांच्या जीवनामध्ये आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. व्यावसायिक शिक्षणामुळे जीवनाच्या गरजा भागतात आणि त्यामुळे जीवनाला स्थैर्य प्राप्त होते. देशाचा आर्थिक विकास, उत्पादन क्षमता, औद्योगिक क्षेत्राची वाढ व विकास होण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे देशातील उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीचा अधिकाधिक उपयोग करून घेता येतो. शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे कुशल कर्मचारी वर्ग निर्माण होऊ शकतात. समतोल आर्थिक विकास साधण्यासाठी व्यावसायिक शिक्षण आवश्यक ठरते. शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे व्यक्ती मानसशास्त्रीयदृष्ट्या योग्य बनते. कारण मानवी शक्ती आणि बुध्दिमत्ता यांचा संबंध येतो. शिक्षणाच्या व्यावसायीकरणामुळे स्वयंरोजगार निर्मितीस मदत होत असते.

## २.६ शिक्षणाचे व्यावसायीकरण - काही समस्या :

व्यवसायामुळे व्यक्तीजवळ जीवनशक्ती चेतना बाळगली जाते. नेहमीच्या पध्दतीप्रमाणे गरजा हा बदलत असतात. व्यवसायामध्ये होणारा बदल व्यवसायाचे महत्व, पध्दती व कार्य याबाबत होतो. मूल्य प्रतिष्ठा आणि कौशल्याची मागणी आणि बुध्दिमत्ता याबाबतीतील बदल घडून येतो. अशा प्रकारचा बदल सतत व वेगाने घडून येतो.

नवीन व्यवसाय शोधामुळे नवीन ज्ञानप्राप्तीमुळे नागरी जीवनामध्ये गुंतागुंत निर्माण होते. नवीन शोधामुळे व्यवसायाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे गुणवत्ता निर्माण करण्यास अडचण निर्माण होते. व्यावसायिक शिक्षण सर्वसाधारण शिक्षणापेक्षा हलक्या दर्जाचे मानले जाते. शिक्षणाचे व्यावसायीकरण करावयाचे झाल्यास शाळांमधून कार्यशाळा उभाराव्या लागतात. आर्थिक पाठबळाशिवाय सुसज्ज कार्यशाळा उभारणे केवळ अशक्य आहे.

व्यावसायिक शिक्षण, सर्वसाधारण व तांत्रिक शिक्षण यामध्ये समन्वय साधला जात नाही.

सर्वसाधारण विचार करता विद्यार्थी आपल्या भविष्यकाला विषयी चिंता करत नाहीत. ते बहुधा उदासीनच असतात. शिक्षकाच्या मतानुसार विद्यार्थी अभ्यासक्रम निवडीत असतात. विद्यार्थ्यांची क्षमता, आवड, दृष्टिकोन यांचा विचार केला जात नाही. व्यवसाय शिक्षणाच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम निवडीबाबत समस्या भेडसावत असते. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण काळामध्ये भेडसावणाऱ्या समस्या व प्रशिक्षणानंतर भेडसावणाऱ्या समस्या अशा दोन प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. पाठ्यपुस्तकाची कमतरता, प्रात्यक्षिक प्रशिक्षणातील अडचणी, कार्यशाळा इत्यादी बाबत समस्या भेडसावतात. प्रशिक्षणानंतर रोजगाराची संधी मिळणे, प्रगत स्वरूपाचा अभ्यास करणे याबाबत समस्या भेडसावत असतात.[११]

## २.७ समारोप :

प्रस्तुत प्रकरणात ' शिक्षणाचे व्यावसायीकरण ' याचा अर्थ, शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची तात्त्विक भूमिका, उद्दिष्टे, महत्त्व व गरज आणि समस्या या बाबींचा ऊहापोह केलेला आहे. या प्रकरणाचा प्रस्तुत संशोधनास पार्श्वभूमी सारखा उपयोग होणार आहे.

पुढील प्रकरणामध्ये (प्रकरण तीन - संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा मागोवा) शिक्षणाच्या व्यावसायीकरणाचे संदर्भात प्रकाशित व संशोधित साहित्याचा मागोवा घेण्यात आलेला आहे.

## संदर्भ

1. Dr. G. Shivarudrappa, Vocationalisation of Education, (Bombay : Himalaya Publishing House, 1988), p.11
2. G. Terry Page, and J.B. Thomas, A.R. Marshall, (Ed.), 'International Dictionary of Education', (London : The English Language Book Society and Kogan Page Ltd., 1979), p. 360.
3. Carter V. Good (ed.), 'Dictionary of Education,'(New York : McGraw Hill Book Company, 1959), p. 603.
4. Chester W. Harris (ed.), Encyclopedia of Educational Research (New York : The Macmillan Company, 1960), p.1555.
5. The American Vocational Education Association, Ibid, p. 1555.
6. John F. Thompson, 'Foundations of Vocational Education' (Englewood Cliffs, New Jersey : Prentice Hall Inc., 1973), p. 110.
7. James S. Ross, 'Groundwork of Educational Theory', (Great Britain : Geogre G. Harrap and Co.Ltd., 1962), p. 216.
8. Dr. G. Shivarudrappa, 'Vocationalisation of Education' (Bombay : Himalaya Publishing House, 1988), p. 11.
9. Bhatia B.D., 'Theory and Principles of Education', 11th Ed. (Delhi : Doaba House, 1970), p. 31.
10. Roy W. Roberts, 'Vocational and Practical Arts Education', 22nd Ed. (New York : Harper and Row Publishers, 1965), p.531.
11. Thimmarich, Seetharmu, Abdul Aziz, Rayappa, 'Vocational Education - Problems and Prospects',(Bombay : Himalaya Publishing House, 1982), pp. 39-40.